|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

दिनांक : 25-07-2023

जा.क्र.कबचौउमवि/५/नुतनीकरण-२०२३-२४/ डी.ओ. 9 / 287 /२०२३

प्रति,

**मा. प्राचार्य/मा.संचालक**
**विशाल शिक्षण प्रसारक मंडळ धुळे संचलित प्रा. ए. बीं. पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, महिंदळे, ता. जि. धुळे**
**ता. धुळे जि. धुळे**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराच्या मान्यतेबाबत**

**संदर्भ :-** १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी / नैसर्गिक विस्तारासाठी [Continuation of Affiliation / Natural Growth] सादर केलेला प्रस्ताव.

२) विद्यापीठाद्वारे जा.क्र KBCNMU/05/ Nutani-NG-2023-24/D.O. 9/ 115/ 2023 दि. 19-04-2023 रोजी नियुक्त करण्यांत आलेली स्थानिक तपासणी समिती

३) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म. रा. पुणे यांचे पत्र जा. क्र. एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६२ दि.२३.०५.२०२३ रोजीचे पत्र

४) विद्यापीठाचे पत्र जा.क्र. कबचौउमवि/११ए/नॅक/११३/२०२३ दि. २६/०५/२०२३

५) मा. विद्यापरिषदेने दि. १८.०७.२०२३ रोजी पारीत केलेला ठराव क्र. सी-१२४/२०२३

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय पत्र क्रमांक ०१ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयासंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारे संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समिती नियुक्त करण्यांत आली होती.

सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालाची, प्राप्त आदेशान्वये, मा. अधिष्ठाता / मंडळाने छाननी व तपासणी करून संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार व विद्यार्थी प्रवेशा संदर्भात शिफारशी करून सदर अहवालास मा. विद्यापरीषदेने मान्यता प्रदान केलेली आहे त्या अनुषंगाने, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास [ Continuation of Affiliation / Natural Growth ] त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम,२०१६ चे कलम ११४(१) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**आपल्या महाविद्यालयास देण्यांत येत असलेली मान्यता ही फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता देण्यांत येत असून सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आपणांस बंधनकारक राहील.**

**याबाबतीत नमूद करण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ३ च्या अनुषंगाने संबंधित महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन / पुनर्मुल्यांकन करणेबाबत सूचित केलेले होते परंतु आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने याबाबतीत कुठलीही कार्यवाही केलेली नसल्याकारणामुळे शै. वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्ष वर्गासाठी विद्यार्थी प्रवेशास "No Admission" करण्यात आलेले आहे, याची कृपया नोंद घ्यावी. प्रथम वर्ष वर्गासाठी विद्यार्थी प्रवेशित केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.**

आपणांस असेही विदीत करणेत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ नुसार संलग्नीकरणासाठी विद्यापीठाने सूचित केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता करणे आपणांस बंधनकारक असून, त्याअनुषंगाने आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या महाविद्यालयसंदर्भात / मान्यताप्राप्त परिसंस्थेससंदर्भात नमूद केलेल्या अटी/त्रुटींचे अवलोकन करून सदरच्या अटी/त्रुटींची परिपूर्ण स्वरूपात पूर्तता करावी व आवश्यक त्या कागदपत्रांसह अटीपूर्तता अहवाल ०३ महिन्यात, तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर होईल अशा बेताने पाठवावा. आपण सदर मुदतीत अटी-पूर्तता अहवाल सादर न केल्यास, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताचे कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

ज्या महाविद्यालयांना सोबतच्या तक्त्यात प्रथम वर्ष व/थेट द्वितीय वर्षाकरीता No Admission असे नमूद केलेले असेल अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता फक्त संलग्नीकरणाचे नुतनीकरणास/नैसर्गिक विस्तारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अशा महाविद्यालयांनी प्रथम वर्षासाठी आणि थेट द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत तथापि, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व शिक्षक नियुक्तीसंदर्भात आणि

स्थानिक चौकशी समितीने नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याबाबत रु. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले हमीपत्र सादर करण्यासह, रिक्त पदांच्या नियुक्तीसाठी पुरेसे प्रयत्न केल्याबाबतचे अनुषंगिक दस्तऐवज तसेच नॅक मूल्यांकन/ पुनर्मुल्यांकन संदर्भात अहवाल सादर केल्यास व त्यास अनुसरून विद्यार्थी प्रवेशास परवानगी मिळणेसंदर्भात विद्यापीठास प्रस्ताव सादर केल्यास विद्यार्थी प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल. मात्र विद्यापीठाच्या अंतिम मान्यतेनंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे याची कृपया नोंद घ्यावी.

यासंदर्भात असेही नमूद करण्यात येते की ज्या महाविद्यालयांनी एकूण मान्य पदांच्या ५०% पदे परिनियम ४१०(१) नुसार भरणे अनिवार्य असून, काही महाविद्यालयांनी अद्याप पर्यंत भरलेली नाहीत. अशा महाविद्यालयांनी याबाबत पुरेसे प्रयत्न केल्याबाबतचे दस्तऐवजांसह विद्यापीठास दोन महिन्यांच्या आत लेखी खुलासा सादर करावा. अन्यथा महाविद्यालयाचे संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास दिलेली मान्यता रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच ज्या संबंधीत महाविद्यालयांच्या याचिका अद्याप मे. कोर्टात प्रलंबीत आहेत, अशा महाविद्यालयांच्या बाबतीत मे. कोर्टाच्या आदेशाच्या अधीन राहून कार्यवाही करण्यांत येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

महाविद्यालयास NAAC/NBA करणे बंधनकारक असल्याबाबत

**यासंदर्भात नमूद करण्यात येते की शासनाने वरील संदर्भीय क्र. ३ अन्वये प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण ) महाराष्ट्र राज्य पुणे यांनी कळविलेले आहे की अध्याप पावेतो एकदाही मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालय व सध्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Institutional information for quality assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) नुसार (ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीचे ते अनुपालन करत नसतील तर राज्य शासनाकडे पाठविणार नाही अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.**

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० मधील पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा यथास्थिती, पुर्नअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुर्नअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला कोणतीही संलग्नता देता येणार नाही." अशा प्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.सबब वर नमूद करण्यात आलेल्या **नॅक मूल्यांकन, मानांकन व पुनर्मुल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षांच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांका पर्यंत करणार नाही अशा महाविद्यालयान बाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील नमूद केलेल्या तरतुदीचा अवलंब करून महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्याची कार्यवाही करण्यात येईल** यांची कृपया नोंद घ्यावी.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी, हि विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

(ग. ना. पवार)
**उपकुलसचिव**
**संलग्नता विभाग**

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता.

**प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-**

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

२) मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

३) मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पहिला मजला जीवन प्राधिकरण भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जळगांव

४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उ.म.वि., जळगांव.

५) मा.उप/सहा.कुलसचिव, संबंधितविद्याशाखा, परीक्षाविभाग, कबचौ उ.म.वि.जळगांव

६) मा. संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, कबचौ उ.म.वि., जळगांव

७) मा. सहाय्यक कुलसचिव/कक्षाधिकारी, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, कबचौ उमवि, जळगांव

८) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, कबचौ उमवि, जळगांव

जा.क्र. कबचौउमवि/५/नुतनीकरण-२०२३-२४/ डी.ओ. 9/ 287/२०२३, दिनांक : 25-07-2023 चे सहपत्र

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता

| Name of College | Details of Additional Division for Nutanikaran for A.Y 2023-24 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Nutanikaran for A.Y 2023-24 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Natural Growth for A.Y 2023-24 [As per Proposal] | A] Observations of Present LIC<br>B] Conditions of Previous LIC<br>C] Conditions of Present LIC | Approval of University to Continuation of Affiliation / Natural Growth for A.Y 2023-24 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| [E200127] - VISHAL SHIKSHAN PRASARAK MANDAL DHULE SANCHALIT PROF. A. B. PATIL ARTS COMMERCE & SCIENCE COLLEGE, MAHINDALE Tal. Dhule Dist. Dhule | | **B.SC. - First Year** - [COMPUTER SCIENCE - General] [MICROBIOLOGY - General] [MATHEMATICS - General] [ZOOLOGY - General] [BOTANY - General] [PHYSICS - General] [CHEMISTRY - General] [INFORMATION TECHNOLOGY - General] [ELECTRONICS - General] [GEOGRAPHY - General] [GEOLOGY - General]<br><br>**B.SC. - Second Year** - [ENGLISH - General] [COMPUTER SCIENCE - General] [MATHEMATICS - General] [ZOOLOGY - General] [BOTANY - General] [PHYSICS - General] [CHEMISTRY - General] [GEOGRAPHY - General]<br><br>**B.SC. - Third Year** - [COMPUTER SCIENCE - Special] [ZOOLOGY - Special] [BOTANY - Special] [CHEMISTRY - Special]<br><br>**B.C.A. - First Year** - AS PER | Second Year- **M.A.(MARATHI)** [ All Compulsory Subjects ] Special<br>Second Year- **M.A. (GEOGRAPHY)** [ All Compulsory Subjects ] Special<br>Second Year- **M.A. (POLITICS)** [ All Compulsory Subjects ] Special<br>Second Year- **M.A.(HISTORY)** [ All Compulsory Subjects ] Special | A] The Building of College is Sufficient to accommodate the number of students enrolled.It is spacious and located at Surat highway.Students have easy access to transportation. Laboratories and Library facilities are sufficient for the students. Classrooms are airy and spacious. There is Ladies room on the campus. Infrastructure is adequate. There is reading room for students. The campus is neat and clean. Considering the future growth, the Library and Sports facilities should be augmented.<br>B] --<br>C] 1.Reference books should be purchased. There is also need of Text books.2.Laboratory equipments should be purched in proportion to the enrollment.3. Considering the area there is need of more trees on the campus. 4.Efforts should be made to appoint qualified teachers. | सदर पत्रात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची ०३ महिन्यांच्या आत तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी, पूर्तता करण्याच्या अधीन राहून संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाकरिता मान्यता प्रदान करण्यात येत असून प्रथम वर्ष वर्गासाठी "No Admission" करण्यात आलेले आहे तथापि नॅक मूल्यांकन / पूर्नमूल्यांकन करणे संदर्भातील पूर्तता अहवाल विद्यापीठास सादर केल्यानंतरच प्रथम वर्ष वर्गाच्या प्रवेशास मान्यता प्रदान करण्यात येईल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | SYLLABUS<br><br>**B.C.A. - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.C.A. - Third Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.COM. - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.COM. - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.COM. - Third Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.A. - First Year** - [MARATHI - General] [DEFENCE STUDIES - General] [PSYCHOLOGY - General] [ECONOMICS - General] [POLITICAL SCIENCE - General] [GEOGRAPHY - General] [HISTORY - General] [HINDI - General] [ENGLISH - General]<br><br>**B.A. - Second Year** - [MARATHI - Special] [MARATHI - General] [POLITICAL SCIENCE - Special] [POLITICAL SCIENCE - General] [GEOGRAPHY - Special] [GEOGRAPHY - General] [HISTORY - Special] [HISTORY - General] [HINDI - Special] [HINDI - General] [COMPULSORY ENGLISH - General]<br><br>**B.A. - Third Year** - [MARATHI - Special] | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | [MARATHI - General]<br>[ECONOMICS - General]<br>[POLITICAL SCIENCE - Special]<br>[POLITICAL SCIENCE - General]<br>[GEOGRAPHY - Special]<br>[GEOGRAPHY - General]<br>[HISTORY - Special]<br>[HISTORY - General]<br>[HINDI - General]<br>[ENGLISH - General]<br><br>**M.A. (MARATHI) - First Year -** AS PER SYLLABUS<br><br>**M.A. (GEOGRAPHY) - First Year -** AS PER SYLLABUS<br><br>**M.A. (POLITICS) - First Year -** AS PER SYLLABUS<br><br>**M.A.(HISTORY) - First Year -** AS PER SYLLABUS | | | | |

(ग. ना. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग